Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July-December 2023 4(2), 4436–4439

# JAMBUWANTRAO DHOTE'S CONTRIBUTION TO MAHARASHTRA POLITICS

# जांबुवंतराव धोटे ह्यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान

Nitesh Devrao Saosakade [1], Dr. Praful Vitthalrao Nande [2]

[1] Corrective Student, Post Graduate History Department, Gondwana Vidyapeeth, Gadchiroli, India
[2] Assistant Professor, Post Graduate History Department, Gondwana Vidyapeeth, Gadchiroli, India

**Corresponding Author**
Nitesh Devrao Saosakade,
ntshsaosakde@gmail.com

**DOI**
10.29121/shodhkosh.v4.i2.2023.5213

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2023 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** Jambuwantrao Dhote was interested in politics since his school life. While studying in college, he decided to do public welfare work. He had formed his organizations to solve the problems of people like farmers, agricultural laborers, workers, auto drivers, tong drivers, owners. Through this organization, Dhote tried to solve the problems of workers, farmers, agricultural laborers. Through administration, he was taking the problems of the people to the government and getting them resolved. While studying in college, he had closely observed the political changes taking place in the then Indian situation. During this period, the Samyukta Maharashtra movement was gaining momentum. Naturally, Jambuwantrao Dhote participated in the movement. Through this movement, he became aware of the politics of the country. In the Samyukta Maharashtra movement, he disrupted the meetings of Vidarbha activists. He was actively involved in the Samyukta Maharashtra movement. Due to his aggressiveness, he was expelled from the college. But his passion for politics and the problems of the people did not allow him to sit idly by. He was not happy with this job as a physical education teacher in the municipal council school. He started working to solve the problems occurring in the cities of Yavatmal. He became their leader by solving the problems of the Kolam, tribal and Dalit people in Yavatmal city. After this, Dhote contested the Yavatmal Nagar Panchayat election and entered local politics. Due to the immense support of the people, Jambuwantrao Dhote became famous in Yavatmal district within a short period of time. The people preferred him as a candidate for the Legislative Assembly and he became the MLA of Yavatmal. He traveled his political life from a member of the Nagar Panchayat to an MLA of the Maharashtra Legislative Assembly, an MP of the Lok Sabha and a king maker who formed the government. After 1985, he was constantly away from power politics. He devoted his entire life to the movement for an independent Vidarbha state.

**Marathi:** जांबुवंतराव धोटे यांना विद्यालयीन जीवनापासूनच राजकारणाची आवड होती. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्यांनी जन कल्याणाचे कार्य करण्याचे ठरविले होते.शेतकरी, शेतमजूर, कामगार, ऑटो चालक, टांगा चालक, मालक यासारख्या लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी त्यांच्या संघटना निर्माण केल्या होत्या. या संघटनेच्या माध्यमातून धोटे यांनी कामगार,शेतकरी,शेतमजूर यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. प्रशासनाच्या माध्यमातून शासनापर्यंत जनतेच्या समस्या पोहोचवून त्याची सोडवणूक करून घेत होते. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना तत्कालीन भारतीय परिस्थितीत होणारे राजकीय बदल त्यांनी जवळून पाहिले होते. या काळामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ जोर धरत होती. साहजिकच जांबुवंतराव धोटे यांनी चळवळीत भाग घेतला. या चळवळीच्या माध्यमातून देशाच्या राजकारणाचे त्यांना जाणीव झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी विदर्भवाद्यांच्या सभा उधळून लावल्या.त्यांच्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सक्रिय सहभाग होता. त्यांच्या आक्रमकपणा मुळे त्यांना महाविद्यालयातून बडतर्फ करण्यात आले. पण राजकारण आणि जनतेच्या समस्य प्रती असलेली तळमळ त्यांना स्वस्त बसू देत नव्हती. त्यांचे नगरपरिषदेच्या शाळेतील शारीरिक शिक्षक या नोकरीत मन रमत नव्हते. यवतमाळ शहरांमध्ये होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कार्य करण्यास सुरुवात केली. यवतमाळ शहरातील कोलाम,आदिवासी व दलित या लोकांच्या समस्या सोडवून ते त्यांचे नेते झाले. यानंतर धोटे यांनी यवतमाळ नगरपंचायत ची निवडणूक लढवून स्थानिक राजकारणात आपले पाऊल ठेवले. जनतेच्या प्रचंड पाठिंब्या मुळे जांबुवंतराव धोटे हे थोड्या कालावधीतच यवतमाळ जिल्ह्यामध्ये प्रसिद्धीस आले. जनतेने त्यांना विधानसभेसाठी उमेदवार म्हणून पसंती दिली आणि ते यवतमाळचे आमदार झाले. नगरपंचायत चे सदस्य ते महाराष्ट्र विधानसभेचे आमदार, लोकसभेचे खासदार आणि सरकार बनवणारे किंग मेकर म्हणून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाचा प्रवास केला. इ.स.१९८५ नंतरच्या काळात ते सत्तेच्या राजकारणापासून सतत दूर होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन स्वतंत्र विदर्भ राज्याच्या आंदोलनासाठी खर्ची घातले.

# 1. प्रस्तावना

जांबुवंतराव धोटे हे स्व प्रेरणेने राजकारणात आले. राजकारणात स्वतःचे अस्तित्व निर्माण करत असताना जनतेला त्यांनी आपल्या राजकारणाचे केंद्रबिंदू मानले आणि जनतेसाठी राजकारण केले. जांबुवंतराव धोटे हे राजकारणी असले तरी त्यांचा पिंड हा क्रांतिकारकाचा होता. त्यांच्या मनामध्ये अन्यायाविषयी चीड होती. कोणावरही अन्याय होताना दिसताच जांबुवंतराव त्यांच्या मदतीला जात होते. अनेकांना राजकीय मदत धोटे यांनी आपल्या जीवनामध्ये केल्या आहे. यात इंदिरा गांधी, बाळासाहेब ठाकरे यासारख्या प्रसिद्ध नेत्यांचा समावेश आहे. त्यांच्या जीवनाचं एक ब्रीदवाक्य होतं, "जिसके नही है कोई उसके हम है भाई. ही मन त्यांच्या कार्यालयात लिहिली होती."[1] त्यामुळे धोटे यांचे अनेकदा राजकीय नुकसान झाल्याचे दिसून येते. पण धोटे यांचे राजकारण सत्तेसाठी नसून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी होते. म्हणूनच त्यांनी त्यांना मिळालेले मंत्रीपद नाकारले. विदर्भातील जनतेला महाराष्ट्र सरकारकडून सावत्रपणाची वागणूक मिळते. विदर्भाचा विकास योग्य प्रमाणावर होत नाही म्हणून स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती चे स्वप्न धोटे यांनी पाहिले नाही तर ते जगले. त्यासाठी विदर्भात राजकारणाची एक फळी निर्माण केली. त्यांनी स्थानिक, राष्ट्रीय आणि केंद्रीय राजकारणात आपले योगदान दिले त्याचा अभ्यास या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

# 2. स्थानिक राजकारणातील योगदान

जांबुवंतराव धोटे हे यवतमाळ नगरपंचायतच्या शाळेमध्ये शारीरिक शिक्षकाची नोकरी करत होते. शिक्षकाची नोकरी करत असतानाच यवतमाळ शहरांमध्ये घडणाऱ्या घटनांकडे त्यांचे बारीक लक्ष राहत असे. यवतमाळ शहरातील नागरिका समोर येणारे प्रश्न, समस्या सोळविण्याची सुरुवात याच काळात धोटे यांनी केली. शहरांमध्ये अनेक समस्या होत्या. यवतमाळ शहरातील दलित वस्ती ही अनेक समस्यांची माहेर घर होते. त्यामुळे धोटे यांनी दलित वस्तीतील समस्या सोडवण्याकडे लक्ष दिले. त्या वेळी दलित वस्तीमध्ये गुंडगिरीची मोठी समस्या होती. सर्वसामान्य लोकांना त्यांचा त्रास सहन करावा लागत असे. विशेषतः स्त्रियांना या गुंडांचा प्रचंड त्रास होता. जांबुवंतराव धोटे हे शारीरिक शिक्षक होते. ते कुस्ती आणि बॉक्सिंग या खेळात विशेष पारंगत होते. त्यामुळे त्यांनी या गुंडांचा चांगला समाचार घेतला आणि दलित वस्तीतील लोकांची त्रासापासून मुक्तता केली. दलित वस्तीतील आपा आपसातील भांडण तंटे सोडविले. दलित वस्तीतील लोकांना धोटे हे आपल्यातील एक व्यक्ती आहे असे वाटत होते. त्यामुळेच दलित वस्तीतील लोकांनी जांबुवंतराव धोटे यांना "भाऊ" या नावाने संबोधण्यास सुरुवात केली. भाऊ हे त्यांच्या समस्या सोळविणारे, सरकारपर्यंत पोहोचविणारे एक माध्यम झाले. दलित वस्तीतील लोकांचे नेते झाले.

अशातच इ. स.१९५९ मध्ये यवतमाळ नगरपंचायत ची निवडणूक जाहीर झाली. जांबुवंतराव धोटे यांनी नोकरीचा राजीनामा देऊन निवडणुकीसाठी अर्ज केला. "हीच भाऊच्या चुनावी राजकारणाचे सुरुवात होय. यालाच जांबुवंत उडी म्हणून प्रसिद्धी मिळाली"[2] यवतमाळ शहरातील वार्ड क्रमांक १४ मधून भाऊंनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाऊंचा प्रतिस्पर्धी हा अत्यंत लोकप्रिय आणि स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा हे होते. ते मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या अगदी जवळचे होते.कोणतेही राजकीय पाठबळ नसताना जांबुवंतराव धोटे यांनी जवाहरलाल दर्डा यांचा नगरपंचायत निवडणुकीमध्ये पराभव केला. आपल्या स्थानिक राजकारणाचा श्री गणेशा केला.

# 3. स्थानिक राजकारण

जांबुवंतराव धोटे यांच्या राजकारणाची गुंफण ही स्थानिक जनसमुदाय आणि त्यांच्या समस्या ची सोडवूनुक या भोवती केंद्रित झाली होती. जांबुवंतराव धोटे यांनी यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत आणि ग्रामपंचायत यांच्या राजकारणाकडे विशेष लक्ष दिले. धोटे यांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविन्यास सुरुवात केली. यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेसची चांगली पकड असतानाही जांबुवंतराव धोटे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय मिळवून दिले. "सुरुवातीला नानाभाऊ एबडवार राळेगाव मधून जिल्हा जिल्हा परिषदेवर निवडून आले. त्यांनी जिल्हा परिषद गाजवली"[3] सत्ताधारी काँग्रेस पक्षाला आव्हान निर्माण केलं. सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारालाही पराभूत करता येते असा आत्मविश्वास जांबुवंतराव धोटे यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केला होता. जांबुवंतराव धोटे यांच्या कार्य कर्तृत्वाने, वक्तृत्वाने, भाषणाने आणि व्यक्तिमत्वाने प्रभावित होऊन तरुण पिढी ने जांबुवंतराव धोटे यांना आपला आदर्श मानले. यातूनच स्थानिक स्तरावर अनेक कार्यकर्ते निर्माण होत गेले. याच कार्यकर्त्यातून पुढे नेते निर्माण झाले. यात नानाभाऊ एडमवार, सुधाकर धुर्वे, हरीश मंदना, सुरेंद्र भुयार आणि बनवारीलाल पुरोहित यासारख्या नेत्यांचा यात समावेश आहे. जांबुवंतराव धोटे यांचे स्थानिक राजकारण फक्त यवतमाळ जिल्ह्यात पुरतेच मर्यादित नव्हते तर संपूर्ण विदर्भात तील स्थानिक राजकारणात त्यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. विदर्भातील अनेक महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यावर जांबुवंतराव धोटे यांच्या कार्यकर्त्यांची सत्ता निर्माण झाली होती.

---

[1] प्रा. निसर्गराज यांची मुलाखत दिनांक २०/११/२०२२

[2] महाराष्ट्र टाईम दैनिक दिनांक १९/०२/२०१७ पृष्ठ क्रमांक ५

[3] चिंतनवेध जांबुवंतराव धोटे संपादित नयनाताई धवड, नाथे पब्लिकेशन नागपूर पृष्ठ क्रमांक९३

## 4. राज्य स्तरावरचे राजकारण

जांबुवंतराव धोटे हे महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतातील यवतमाळ जिल्ह्याचे रहिवासी होते. त्यांच्या राजकारणाची सुरुवात स्थानिक स्तरावरून सुरू झाली असली तरी लवकरच ते महाराष्ट्र राज्याच्या राजकीय पटलावर त्यांचा उदय झाला. महाराष्ट्र राज्याचे निर्मिती १ मे १९६० मध्ये झाली.१९६२ मध्ये महाराष्ट्र राज्याची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून त्यांचा चांगला जनसंपर्क निर्माण झाला होता. यात जोरावर त्यांनी विधानसभेची निवडणूक लढविण्याचे ठरविले होते. यवतमाळ निर्वाचन क्षेत्रातून जांबुवंतराव धोटे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या विरोधात काँग्रेसच्या छबुताई डहाके यांना उमेदवारी मिळाली होती. या काळात संपूर्ण विदर्भात काँग्रेसचे प्रभुत्व असले तरी जांबुवंतराव धोटे यांनी स्वकर्तृत्वाने काँग्रेसच्या प्रभुत्वाला शह दिला. निवडणूक प्रचारात “राजकारणात करायची सर्व नाटके केली. जमिनीवर बसून हातावर भाकरी घेऊन खाल्ली. घरोघरी फिरून प्रचाराचा विक्रम केला. काँग्रेसकडे संपत्ती, सत्ता, साधने याचा महापूर असूनही छबुताई डहाके यांचा पराभव झाला.”[4] महाराष्ट्र विधानसभेतील सर्वात तरुण आमदार म्हणून जांबुवंतराव धोटे ह्यांनी महाराष्ट्र विधानसभेत प्रवेश केला. जांबुवंतराव धोटे हे सुरुवाती पासूनच आक्रमक नेते होते. जनतेच्या समस्या सरकार दरबारी मांडताना त्यांचा आक्रमकपणा दिसून येतो. जनतेवर होणारा अन्याय त्यांना सहन होत नसे. याची प्रचिती लवकरच महाराष्ट्र विधानसभेला आली. विधानसभा अध्यक्ष बाबासाहेब भारदे यांनी कामगारांच्या समस्यावर बोलू न दिल्याने धोटे आक्रमक झाले. त्यांनी पेपर वेट विधानसभा अध्यक्षाच्या दिशेने भिरकाविले. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर अध्यक्षांना धक्काबुक्की केली. या घटनेस धोटे यांना जबाबदार धरून त्यांची विधानसभा सदस्यता रद्द करण्यात आली. “सदस्यता रद्द झालेले धोटे हे महाराष्ट्र विधान सभेचे पहिले आमदार होते”[5] पेपर वेट प्रकरणा मुळे धोटे यांना तुरुंगवास झाला. तुरुंगातून पोटनिवडणूक लढवून धोटे पूर्वी पेक्षा जास्त मताधिक्याने यवतमाळ मतदारसंघातून निवडून आले. धोटे यांचं राजकारण हे जनतेसाठी असल्यामुळेच जनतेच्या पाठिंब्याने ते पुन्हा विधानसभेत निवडून आले. आमदार असताना त्यांनी शेतकरी, शेतमजुरांसाठी आंदोलन केले. भूमिहीन शेतकऱ्यांना शेत जमिनीचे पट्टे मिळवून दिले होते.

जांबुवंतराव धोटे यांच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव होता. “सुरुवातीच्या काळात जांबुवंतराव धोटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीत काम केले होते.”[6] जांबुवंतराव धोटे नेताजी सुभाष चंद्र बोस यांना आपले आदर्श मानत होते. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षात आपण काम करावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यासह फॉरवर्ड ब्लॉक पक्षामध्ये प्रवेश केला. विदर्भात स्वतःच्या कर्तुत्वावर जांबुवंतराव धोटे यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षाला महत्त्व प्राप्त करून दिले. फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे ते महाराष्ट्राचे प्रमुख होते. “निवडणुकीत प्रचार करणे युती करणे आणि उमेदवारी देणे हे पक्षातील महत्त्वाचे काम धोटे यांच्याकडे होते.”[7] आपल्या कुशल नेतृत्वाने काँग्रेस पक्षाला विदर्भात त्यांनी आव्हान निर्माण केले. “जांबुवंतराव धोटे तुरुंगात असतानाही त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे १८ आमदार आणि २ खासदार निवडून आणले होते.”[8] एवढी मोठी शक्ती त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षांमध्ये निर्माण केली होती. इ.स.१९७२ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये फॉरवर्ड ब्लॉक पक्षाने ८.८% मते घेऊन दोन उमेदवार विजयी झाले होते. या निवडणुकीत धोटे यांच्या पक्षाची कामगिरी अत्यंत चांगली होती. अनेक उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. धोटे यांना मिळणारा जनाधार प्रचंड होता. म्हणून सर्वसामान्य लोकांमध्ये त्या काळात एक मन प्रचलित होती, “गाय वासरू खुट्याले मत द्या धोट्याले”त्या काळी फॉरवर्ड ब्लॉक पक्ष हा धोटे यांच्याच नावाने ओळखला जायचा ही त्यांच्या कार्याची पावतीच म्हणावी लागेल.

## 5. महाराष्ट्राच्या राजकारणात किंग मेकर चे कार्य

जांबुवंतराव धोटे यांना महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. इ.स.१९७७ ते इ.स.१९८४ चा तो काळ होता. जांबुवंतराव धोटे हे राजकारणाच्या सर्वोच्च बिंदूवर पोहोचले होते. या काळात धोटे हे इंदिरा काँग्रेसमधील अत्यंत महत्त्वाचे नेते होते. देशामध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले असले तरी महाराष्ट्रात युती शिवाय सरकार निर्माण करता येत नव्हते. अशा परिस्थितीत काँग्रेस (अर्स) ची मदत घेऊन सरकार स्थापन करण्याच्या चर्चा सुरू झाल्या. “जांबुवंतराव धोटे यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या सूचनेप्रमाणे वसंत दादा पाटील यांना मुख्यमंत्री आणि नासिकराव तिळपूळे यांना उपमुख्यमंत्री असलेले सरकार गठीत करण्याचे ठरविले होते.”[9] नाशिकराव तिरपुडे यांच्या विरोध शमून जांबुवंतराव धोटे यांनी महाराष्ट्रामध्ये दोन्ही काँग्रेस मिळून युती सरकार स्थापन केले. त्यांनी या कार्यामध्ये बजावलेल्या भूमिकेमुळे ते खरे किंगमेकर होते हे स्पष्ट होते. कार कीर्तीच्या सर्वोच्च बिंदू नंतर उतरती कडा लागते हे इतिहासाच्या अध्ययनावरून दिसून येते. जांबुवंतराव धोटे यांच्या राजकीय राजकीय कारकीर्दीचा

---

[4] तरुण भारत दैनिक, मध्यमा दिनांक २७ फेब्रुवारी १९८५

[5] डॉ. शेषराव अनिल करडेकर महाराष्ट्राची वाटचाल विद्या प्रकाशन पुणे पृष्ठ क्रमांक ५६

[6] माजी मंत्री नानाभाऊ एडमवार यांची मुलाखत. ३०/०८/२०२१

[7] महाराष्ट्र प्रदेश फॉरवर्ड ब्लॉक कार्यकारिणीची सभा व निर्णय दिनांक ५/१२/१९७७

[8] देश यात्रा आय.बी.एम. लोकमत जांबुवंतराव धोटे आणि श्रीहरी अने यांची मुलाखत महेश मात्रे यांनी घेतली दिनांक २८/०८/२०१६

[9] चिंतनवेध लेखक जांबुवंतराव धोटे संपादित डॉ. नयना धवड नाथे पब्लिकेशन नागपुर पृष्ठ २१८

अभ्यास करताना ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. श्रीमती इंदिरा गांधीच्या मृत्यूपर्यंत जांबुवंतराव धोटे यांचे राजकारण सर्वोच्च बिंदूवर होते. इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर च्या काळात त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कडा लागली. ती दूर करण्याचा प्रयत्न जांबुवंतराव धोटे यांनी वेळोवेळी केला. यासाठी त्यांनी विदर्भ जनता काँग्रेस नावाचा पक्ष निर्माण केला. शिवसेनेत प्रवेश केला, स्वतंत्र विदर्भासाठी अनेक पक्ष एकत्र करून विदर्भ जॉईन एक्शन कमिटी निर्माण केली. पण पूर्वी प्रमाणे त्यांच्या राजकारणाला जन प्रतिसाद मिळाला नाही. अशा प्रकारे एका तेजस्वी नेत्याचा राजकीय पटला वरून अस्त झाला.

## 6. निष्कर्ष

1) जांबुवंतराव धोटे यानी विदर्भाच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावली.
2) जांबुवंतराव धोटे यांनी विदर्भामध्ये अनेक नेते, कार्यकर्ते तयार केले आणि त्यांना मंत्रिपदापर्यंत पोहोचविले.
3) महाराष्ट्राच्या राजकारणात किंग मेकर म्हणून भूमिका वटविली.
4) जांबुवंतराव धोटे यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षाला विदर्भामध्ये महत्त्व प्राप्त करून दिले.
5) जांबुवंतराव धोटे यांनी स्वत:ला जाती पातीच्या राजकारणापासून दूर ठेवले.
6) जांबुवंतराव धोटे यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू सत्ता नसून जनता होती.

## संदर्भ ग्रंथ


आधुनिक विदर्भाचा इतिहास डॉ. नि. आ. वक्काणी श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.
वैदर्भिय इतिहासाची सोनेरी पाने दिगांमबरक कापसे(सं. पा),कापगते,सातभाई,हातेवर. डॉ. भा. रा. अंधारे,कार्य गौरव समिति, नागपूर.
नागपूर शहरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ १७०२-२००२ शांता कोठेकर व भा. रा. अंधारे(सं. पा.) बोबडे प्रकाशन,नागपूर.
विदर्भ जनता काँग्रेसची प्रबोधनगाथा, जांबुवंतराव धोटे (मु. संपा) विदर्भ जनता काँग्रेस,सेवाग्राम वर्धा.
चिंतनवेध लेखक जांबुवंतराव धोटे, संपादित डॉ. नयना धवड, नाथे पब्लिकेशन, नागपुर.
डॉ. शेषराव अनिल करडेकर, महाराष्ट्राची वाटचाल, विद्या प्रकाशन, पुणे.
प्रा. निसर्गराज यांची मुलाखत दिनांक २०/११/२०२२
माजी मंत्री नानाभाऊ एडमवार यांची मुलाखत. ३०/०८/२०२१
महाराष्ट्र प्रदेश फॉरवर्ड ब्लॉक कार्यकारिणीची सभा व निर्णय दिनांक ५/१२/१९७७
देश यात्रा आय.बी.एम. लोकमत जांबुवंतराव धोटे आणि श्रीहरी अने यांची मुलाखत महेश मात्रे यांनी घेतली दिनांक २८/०८/२०१६
महाराष्ट्र टाईम दैनिक दिनांक १९/०२/२०१७
तरुण भारत दैनिक, मध्यमा दिनांक २७ फेब्रुवारी १९८५